RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ८२

दि.१९ जुलै २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# क्वांटम कॉम्पुटिंग, डीप टेक टेक्नॉलॉजीशी जुळवून घेण्यासाठी परिसंस्था निर्माण करणार - मुख्यमंत्री





**मुंबई/प्रतिनिधी :** क्वांटम कॉम्पुटिंग आणि डीप टेक टेक्नॉलॉजीने आज संपूर्ण जगामध्ये एक मोठी क्रांती घडवून आणली आहे. या तंत्रज्ञानाने केलेल्या अफाट वाढीशी, त्याच्या वेगाशी त्वरेने जुळवून घेणे आवश्यक आहे, त्यासाठी परिपूर्ण अशी इकोसिस्टिम (परिसंस्था) निर्माण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे झालेल्या इंटर क्शन वुईथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉरमेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरींग हब ण्ड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, महाराष्ट्र राज्य 'मित्रा' चे दीपक करंजीकर, लिकॉन कॅस्टलॉयचे हर्ष गुणे, लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोळकर, क्टीन टेक्नॉलॉजीचे विकास महाजन, बिग्रेडीयर सचिन कालिया, स्टॅटरजिक रिसर्च ण्ड ग्रोथ फाऊंडेशनचे वरुण खंदारे, सिम्बॉयसिसच्या प्र. कुलगुरु डॉ. स्वाती मुजूमदार, माजी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडिस्ट्रिज ण्ड ग्रीकल्चरचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत गिरबणे, इंडियन इस्टिटयूट ऑफ सायन्स ण्ड रिसर्चचे प्रसन्नजित फडणवीस, पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, टाटा स्टिल लि. चे माजी उपाध्यक्ष सी. आर. कुलकर्णी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,या तंत्रज्ञानाचा जागतिक स्तरावरील वाटा २०२४ मध्ये जवळपास २ ते ३ ट्रिलियन डॉलर्स होता, जो पुढील पाच वर्षांत सुमारे १६ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. मानवी इतिहासात आपण यापूर्वी कधीही अशी गती आणि वाढ पाहिलेली नाही. त्यामुळे आपल्याला या विकासाच्या प्रवासाचा एक महत्त्वाचा भाग व्हावेच लागेल.

मुख्यमंत्री म्हणाले, संयुक्त राष्ट्रांच्या (United Nations) फ्रंटियर टेक्नॉलॉजी इंडेक्सकडे (Frontier Technology Index) पाहताना भारत यामध्ये चांगली कामगिरी करतना दिसत आहे. आपण सध्या ३६ व्या क्रमांकावर असलो, तरी आपली गणना अपेक्षेपेक्षा सरस कामगिरी करणारे म्हणून केली जात आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून आपण या क्षेत्रात उत्तम काम करत आहोत. या तंत्रज्ञानाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आपण करत असलेले प्रयत्न सध्या विखुरलेले आणि वैयक्तिक पातळीवर अधिक केंद्रित असले, तरी आपण या प्रयत्नांचे संस्थात्मकीकरण केले, तर संपूर्ण चित्र बदलू शकते.

आज सिलिकॉन, एआय - कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्वाँटम कॉम्पुटिंग जग बदलून टाकणाऱ्या आहेत असे सांगून ते म्हणाले, आपल्या व्यवसायाचा प्रत्येक भाग या तीन गोष्टींमुळे सकारात्मक, नकारात्मक किंवा क्रांतिकारी पद्धतीने प्रभावित होणार आहे. त्यासाठी मजबूत इकोसिस्टीम (परिसंस्था) तयार करावी लागेल अन्यथा आपण काळाच्या ओघात मागे पडू. विशेषतः उत्पादन क्षेत्रात आपली सर्वात मोठी ताकद असणारे आपले एमएसएमई उद्योग निधीची कमतरता आणि क्षमतांसह इतर अनेक गोष्टींच्या अभावामुळे या तंत्रज्ञानाचा लाभ घेऊ शकत नाहीत. सर्वांगीण विकासासाठी इकोसिस्टीम तयार करायची असेल, तर सर्वांना सहज उपलब्ध असणारे स्मार्ट सुविधा आणि प्लॅटफॉर्म्स निर्माण करावे लागतील. आणि या स्मार्ट व्यवसायांच्या गरजा पूर्ण करू शकणारे सक्षम मनुष्यबळ तयार करावे लागेल.

महाराष्ट्राला जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनवण्यासाठी, या तंत्रज्ञानामध्ये आपल्याला मोठ्या प्रमाणावर सर्वसमावेशकता आणावी लागेल. त्यासाठी अशा विशिष्ट तंत्रज्ञानाला समर्पित असणारी संस्था उभारणे अत्यंत आवश्यक आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

केंद्र सरकारच्या क्वाँटम तंत्रज्ञानासंबंधीच्या योजना आधीच सुरू झाल्या असल्याचे सांगून आपण आपल्या प्रयत्नांना केंद्र सरकारच्या या उपक्रमांशी सुसंगत करणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य शासनाला या तंत्रज्ञानामध्ये काम करणाऱ्या संस्थेची गरज तीव्रतेने जाणवत आहे. 'मित्रा' या दिशेने विचार करत आहे आणि काम करत आहे. स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि डीप टेकसाठी एक ठोस धोरणात्मक चौकट तयार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन धोरणांचे संस्थात्मक एकत्रिकरण करण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी व्यक्त केली.

मुख्यमंत्री म्हणाले, अधिकाधिक लोकांना याचा लाभ घेता यावा यासाठी नवीन सुविधा आणि प्लॅटफॉर्म्सच्या बाबतीत शासन गुंतवणूक करण्यास पूर्णपणे तयार आहे. मित्रा'ने ठरवल्याप्रमाणे, आपल्याला क्वाँटम कम्प्युटिंगच्या प्रशिक्षकांचा एक मोठा गट तयार करायचा आहे, जे पुढे इतरांना प्रशिक्षित करतील. पुढील दोन तीन वर्षांत क्वाँटम कम्प्युटिंग क्षेत्रात किमान पाच हजार लोकांना प्रशिक्षित करण्याचे ध्येय असल्याचेही त्यांनी सांगितले.

सध्या वेगवेगळ्या पातळीवर होत असलेले हे सर्व प्रयत्न एकत्र आणून त्यांचे संस्थात्मकीकरण केले जाऊ शकते. त्या दृष्टीने इंटरॅक्शन विथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉर्मेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरिंग हब अँड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट हा खरोखरच एक उत्तम उपक्रम आहे. मुंबईमध्ये विकसित होत असलेल्या 'इनोव्हेशन सिटी' साठी शासनाने टाटा समूहाशी भागीदारी केली असून ते सध्या या इनोव्हेशन सिटीचा संपूर्ण आराखडा तयार करत आहेत. एफटीआयचा हा उपक्रम इनोव्हेशन सिटीच्या संकल्पनेशी तंतोतंत जुळणारा आहे, त्यामुळे आपण यामध्येही एकत्र काम करू शकतो, असेही त्यांनी या विषयासाठी विविध क्षेत्रातील जमलेल्या तज्ञांशी बोलताना सांगितले.

यावेळी उपस्थित तज्ज्ञांनी विविध क्षेत्रांमध्ये क्वाँटम तंत्रज्ञानाचा असलेला स्कोप याबद्दल चर्चा केली. हर्षवर्धन गुणे यांनी प्रास्ताविक केले, विकास महाजन यांनी आभार मानले.

## महसूल विभागात लिपिक पदाच्या नोकरीचे आमिष दाखवून सख्या भाच्याला १९ लाखाला गंडविले !




**केज/प्रतिनिधी :** महसूल विभागात लिपिक/महसूल सहाय्यक या पदाची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून मामाने त्याच्या सख्या भाच्याला, न्यायालयात लिपिक पदावर कार्यरत असलेल्या मामाने १९ लाख रुपयाला गंडविल्याचा प्रकार केज तालुक्यात घडला आहे. या प्रकरणी मामा विरुद्ध केज पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल दाखल झाला आहे.

बीड जिल्ह्यातील तांबवा ता. केज येथील अमोल मधुकर चिगुरे या तरुणाचे सख्खे मामा (आईचा भाऊ) दगडू विठ्ठलराव हंगरगे (रा. माऊली नगर, जलालपूर रोड, परळी वैजनाथ, ह. मु. पालम, जि. परभणी) हे परभणीच्या जिल्हा व सत्र न्यायालयात लिपिक पदावर कार्यरत आहेत. या मामाने आपला भाचा अमोल चिगुरे यास विश्वासात घेऊन महसूल विभागात लिपिक/महसूल सहाय्यक या पदाची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून त्यासाठी १९ लाख रुपयांची मागणी केली. त्या नुसार अमोल चिगुरे याने ७ जून २०२२ व ५ जुलै २०२२ रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या केज शाखेतून ऑनलाईन आरटीजीएस द्वारे आणि ८ जानेवारी २०२३ रोजी घरी असे एकूण १९ लाख रुपये मामा दगडू हंगरगे यांना दिले.

हे पैसे देऊन सुद्धा तीन वर्षा पासून नोकरी लागत नसल्याने, त्याने मामाला विचारणा केली असता त्याने खोटे आश्वासन देत फसवणूक केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्या नंतर अमोल चिगुरे याने त्याचे मामा दगडू हंगरगे यांच्याकडे पैसे परत देण्याची मागणी करून देखील तो पैसे परत देत नसल्याने दि. १७ जुलै रोजी त्याने केज पोलिस ठाण्यात दगडू हंगरगे याच्या विरुद्ध दिलेल्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील घटनेचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम हे करत आहेत.

## बदलापुरातील नारायणा स्कुल बेकायदेशीर, शाळेला शिक्षण विभागाचा झटका; अध्यक्षांसह मुख्याध्यापकावर गुन्हा

**ठाणे/प्रतिनिधी :** यंदाच्या वर्षासाठी शाळांचे शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून विद्यार्थीही शालेय कामात, अभ्यासात मग्न झाले आहेत. मात्र, पुन्हा एकदा बदलापुरातील शाळा केंद्रस्थानी आली असून शिक्षण विभागाने चक्क शाळेच्या अध्यक्षांसह मुख्याध्यापकावरही गुन्हा दाखल केला आहे. बदलापूर येथील नारायणा इंग्लिश मीडियम स्कुलविरोधात शिक्षण विभागाने मोठी कारवाई केली आहे. आवश्यक शासकीय मान्यता नसतानाही शाळा सुरू करून विद्यार्थ्यांचे प्रवेश घेतल्याप्रकरणी शाळेचे अध्यक्ष, सचिव आणि मुख्याध्यापकांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र गुन्हा आणि दंडात्मक कारवाई होऊनही शाळा अजूनही सुरूच असल्याचा प्रकार समोर आलाय.

शाळा प्रशासनाविरुद्ध सातत्याने विद्यार्थी आणि पालकांच्या तक्रारी येत असतात. नुकतेच आरटीई म्हणजे शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेश घेर्णाया विद्यार्थ्यांना शाळांकडून दुय्यम वागणूक दिल्याची पालकाची ओरड होती. तसेच, काही शाळांकडून पाठ्यपुस्तकांसाठी पैशांचीही मागणी केल्याचे पालकांचे म्हणणे होते. मात्र, आता चक्क शिक्षण विभागालाही शाळा प्रशासन जुमानत नसल्याची बाब समोर आली आहे. बदलापूरच्या शिरगाव येथील नारायणा शाळेविरोधात अंबरनाथचे गटशिक्षणाधिकारी विशाल पोतेकर यांच्या तक्रारीवरून बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

शिक्षण विभागाने या शाळेला अनधिकृत घोषित करून बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, यंदाच्या वर्षी प्रवेश न घेण्याचेही बजावले होते. विशेष म्हणजे, शाळेबाहेर फलक लावून विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेण्याचं आवाहनही शिक्षण विभागाकडून करण्यात आलं होतं. मात्र, तरीही शाळा प्रशासनाने यंदाच्या वर्षी शाळा सुरू केल्याने शाळेला एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच, प्रतिदिन १० हजार रुपये दंडही आकारण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी पोतेकर यांनी दिली. अनधिकृत शाळेला टाळे ठोकण्याचा अधिकार शिक्षण विभागाला नाही. त्यामुळे, ही दंडात्मक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. मात्र, शाळेवर ठोस कारवाई न झाल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. सध्या या शाळेत पहिली ते दहावीचे वर्ग सुरू असून ५३८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे, विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी शाळा प्रशासन नेमकं काय भूमिका घेतंय याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, याबाबत शाळा प्रशासनाशी संपर्क साधून बाजू मांडण्याचा प्रयत्न केला असता, शाळा प्रशासनाने मीडियाशी बोलण्यासही नकार दिला.

त्यामुळे, शाळा अध्यक्ष आणि प्रशासनला नेमका कशाची मुजोरी आहे, ते मुग गिळून गप्प का आहेत, असा प्रश्न देखील यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

## बुलढाण्यात पावसाची ओढ; 'धोंडी धोंडी पाणी दे' म्हणत बळीराजाचे विठुरायाला साकडे

**बुलढाणा /प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात गेल्या दहा-बारा दिवसांपासून पावसाने पूर्णपणे दडी मारल्याने शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे गंभीर संकट उभे ठाकले आहे. नुकतीच पेरलेली ज्वारी, बाजरी, कपाशी आणि इतर पिके पाण्याअभावी करपून नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. एकीकडं बोगस बियाण्यांमुळे अनेक शेतकऱ्यांना आधीच दुबार पेरणी करावी लागली होती, त्यात आता निसर्गाच्या लहरीपणामुळं उभी पिकं हातची जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळं जिल्ह्यातील बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. रुसलेल्या वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी जुनी 'धोंडी' परंपरा पुन्हा जागवली आहे. विठुरायाच्या चरणी साकडं घालत शेतकरी आणि ग्रामस्थ ''धोंडी धोंडी पाणी दे, ज्वारी-बाजरी पिकू दे...'' असा गजर करत पावसासाठी आर्त प्रार्थना करत आहेत.

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते शिवणखेड खुर्द येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण



**लातूर/प्रतिनिधी :** सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य देऊन विविध विकासकामे पूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले. अहमदपूर तालुक्यातील शिवणखेड खुर्द येथे आयोजित १ कोटी ६८ लाख रुपयांच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.

शिवणखेड गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर विकास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. भविष्यातही या गावाच्या प्रगतीसाठी भरीव निधी देण्यास शासन कटिबद्ध असून, जनतेने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवत तळागाळातील नागरिकांपर्यंत विविध शासकीय योजना पोहचविल्या जातील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रुक्सानाबी करीमसाब शेख होत्या. तसेच जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंदराव सुरवसे, जि. प. समाजकल्याण सभापती उत्तमराव माने, रोकडा जिल्हा परिषद सदस्य अश्विन नागराळे, शिवानंद हेंगणे, पंचायत समिती सदस्य कृष्णराज भोसले व रवींद्र बोडके, महेश बँकेचे उपाध्यक्ष निवृत्तीराव कांबळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ग्रामविकास अधिकारी महेश देवरसे यांच्या प्रास्ताविकाने झाली. या प्रसंगी जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती उत्तमराव माने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

अत् ! दीप!! भव !!!
मायेची गेली सावली ! करुणेचा हरवला सागर !!
उरली नाही साथ आम्हाला ! आठवण येते क्षणा क्षणाला !!
भावपूर्ण आदरांजली



आयु.
आपणास कळविण्यात येते की, आमची माय
स्मृतीशेष लोचनाबाई प्रभाकर सरवदे
निर्वाण दिन- 08 जुलै 2025
यांचा
प्रथम पुण्यस्मरण दिन
दि. 19/07/२०२६ रविवार रोजी करण्याचे योजिले आहे.
तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.
विधी : धम्मदेसना सकाळी 11.30 वा. डॉ.प्रा.किर्तीराज लोणारे
आपले विनीत
नवनाथ प्रभाकर सरवदे, जगन प्रभाकर सरवदे
व समस्त सरवदे परिवार
भोजन वेळ :
दु. 01 ते 03 पर्यंत
स्थळ : माता रमाई आंबेडकर चौक, अंबाजोगाई जि. बीड
कृपया पावसाळा असल्यामुळे कार्यक्रम वेळेवर सुरु होईल.

## संपादकीय...

## निर्णय संसदेचे की न्यायालयाचे?

उपवर्गीकरणाच्या वादातून उभे राहिलेले प्रश्न लडाखमधील सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाच्या निमित्ताने एक प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. देशातील महत्त्वाचे सामाजिक आणि राजकीय प्रश्न सोडविण्याची जबाबदारी लोकांनी निवडून दिलेल्या सरकारची आणि संसदेची असताना अनेकदा त्याचा अंतिम निर्णय न्यायालयाकडे जातो. त्यामुळे लोकशाहीतील संस्थांच्या भूमिकेबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दाही याच प्रकारातील आहे. हा विषय केवळ कायदेशीर नाही, तर सामाजिक, राजकीय आणि घटनात्मक स्वरूपाचा आहे. त्यामुळे अशा विषयांवर व्यापक चर्चा, सर्व संबंधित घटकांचे मत आणि संसदीय विचारविनिमय आवश्यक असल्याचे अनेकांचे मत आहे. भारताची संसद ही देशातील सर्वोच्च कायदे करणारी संस्था आहे. सामाजिक न्यायाशी संबंधित प्रश्नांवर कायदे करणे आणि धोरणे ठरविणे ही संसदेची मूलभूत जबाबदारी आहे. दुसरीकडे, न्यायालयाचे काम संविधानाचा अर्थ लावणे आणि कायद्यांची घटनात्मक वैधता तपासणे हे आहे. न्यायालय धोरण तयार करत नाही; ते विद्यमान कायद्यांच्या चौकटीत निर्णय देते. अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने संविधानातील तरतुदींचा अर्थ लावत निर्णय दिला. त्यानंतर विविध राज्ये आणि राजकीय पक्षांनी त्याबाबत वेगवेगळ्या भूमिका घेतल्या. या निर्णयानंतर देशभरात समर्थन आणि विरोध अशा दोन्ही प्रतिक्रिया उमटल्या. अनेक सामाजिक संघटनांनी आंदोलन केले, तर काहींनी या निर्णयाचे स्वागत केले. लोकशाहीमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान राखणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, एखाद्या विषयावर वेगळे धोरण स्वीकारायचे असल्यास संसदेला कायदे करण्याचा अधिकारही आहे, तो संविधानाच्या चौकटीत वापरला जाऊ शकतो. आरक्षणासारखा संवेदनशील विषय समाजातील विविध घटकांवर दूरगामी परिणाम करणारा असतो. त्यामुळे अशा विषयांवर राजकीय सहमती निर्माण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. संसदेमध्ये सखोल चर्चा, संसदीय समित्यांचा अभ्यास, तज्ज्ञांचे मत आणि समाजातील सर्व घटकांचा सहभाग यामुळे कोणताही निर्णय अधिक व्यापक स्वीकारार्ह ठरू शकतो. जर प्रत्येक मोठ्या सामाजिक प्रश्नाचा शेवट न्यायालयातच होणार असेल, तर लोकप्रतिनिधी संस्थांची भूमिका कमी होत असल्याची भावना जनतेमध्ये निर्माण होऊ शकते. लोकशाहीत संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका या तिन्ही संस्था स्वतंत्र असल्या तरी परस्परपूरक आहेत. कोणत्याही एका संस्थेवर सर्व जबाबदारी पडणे ही आदर्श परिस्थिती नाही. उपवर्गीकरणाच्या प्रश्नाने अनुसूचित जातींमध्ये मतभेद निर्माण होऊ नयेत, याची काळजी सर्व राजकीय पक्ष आणि सामाजिक नेतृत्वाने घेतली पाहिजे. सामाजिक सलोखा टिकविणे हे सर्वांचे समान कर्तव्य आहे. राजकीय मतभेद असू शकतात; परंतु समाजात वैरभाव निर्माण होईल, अशी भाषा किंवा भूमिका टाळणे आवश्यक आहे. सरकारने या विषयावर सर्वपक्षीय बैठक, सामाजिक संघटनांशी संवाद आणि तज्ज्ञांशी चर्चा घडवून आणली, तर अनेक गैरसमज दूर होऊ शकतात. लोकशाहीमध्ये न्यायालय अंतिम घटनात्मक व्याख्या देऊ शकते; मात्र धोरणात्मक आणि राजकीय निर्णयांबाबत संसदेची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहते. देशातील नागरिकांना संघर्ष नव्हे, तर स्थिर आणि सर्वसमावेशक उपाय हवा आहे. तो उपाय केवळ न्यायालयीन निर्णयातून नव्हे, तर व्यापक राजकीय संवादातूनही शोधावा लागेल. उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ कायद्याचा विषय नाही; तो सामाजिक न्याय, समानता आणि प्रतिनिधित्वाशी निगडित आहे. त्यामुळे प्रत्येक पाऊल अत्यंत जबाबदारीने उचलणे आवश्यक आहे. आजची गरज न्यायालय आणि संसद यांच्यात तुलना करण्याची नाही, तर दोन्ही घटनात्मक संस्थांनी आपापल्या भूमिकेतून संविधानातील समानता, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्ये अधिक बळकट करण्याची आहे. समाजहित आणि संविधानाचा सन्मान हेच कोणत्याही निर्णयाचे अंतिम ध्येय असले पाहिजे.

# विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांचे अस्तित्व संपवू देणार नाही; शक्तीपीठ महामार्ग रद्द होईपर्यंत लढा सुरुच राहणार: माजी मंत्री, आ. अमित देशमुख

## पंढरपूर येथील भव्य सद्बुद्धी दिंडी यात्रेत घेतला सहभाग; हजारो शेतकऱ्यांचा एल्गार







**पंढरपूर :** शेतकरी विरोधी आणि अजिबात गरज नसलेला राज्यातील प्रस्तावित नागपूरगोवा शक्तिपीठ महामार्ग तातडीने रद्द करावा, या मागणीसाठी शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीने आज पंढरपूर येथे भव्य जनआंदोलन आणि सद्बुद्धी दिंडी पायी यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी भर पावसात या आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी होत शेतकऱ्यांच्या या लढ्याला जाहीर पाठिंबा दिला.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पंढरपूर दौऱ्यावर येत असतानाच, शेतकरी नेते व माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली वाखरी पालखी तळ येथून या आंदोलनाची सुरुवात झाली. यामध्ये राज्यातील १३ जिल्ह्यांतील हजारो शेतकरी, ग्रामस्थ आणि विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

भर पावसात विठ्ठल चरणी साकडे!

सद्बुद्धी दिंडी पायी यात्रा वाखरीवरून निघून सह्याद्री नगर, जुना कराड नाका, प्रबोधनकार ठाकरे चौक, स्टेशन रोड आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे थेट श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरापर्यंत पोहोचली. आंदोलकांनी विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना करून, राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या भावना समजून घेण्याची आणि हा विनाशकारी प्रकल्प रद्द करण्याची सद्बुद्धी द्यावी, असे साकडे घातले.

सरकार शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करून कंत्राटदारांचे खिसे भरण्याचे काम करत आहे आमदार अमित देशमुख इसबावी येथील संतराज पॅलेस हॉलमध्ये झालेल्या शेतकरी मेळाव्यात बोलताना आमदार अमित देशमुख यांनी सरकारवर कडाडून टीका केली, ते म्हणाले कोणीही मागणी केलेली नसताना, हजारो शेतकऱ्यांना भूमिहीन बनवणारा, राज्याला कर्जाच्या खाईत लोटणारा शक्तीपीठ महामार्ग बांधण्याचा सरकारने घाट घातला आहे. शक्तीपीठ ऐवजी सक्तीपीठ ठरत असलेला हा महामार्ग रद्द करण्यासाठी शेतकऱ्यांनी उभारलेल्या लढ्यात आपण पूर्ण शक्तीनिशी सहभागी असल्याची ग्वाही दिली.

यावेळी पूढे बोलतांना ते म्हणाले, यापूर्वी महायुती सरकारमधील तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापुरात हा महामार्ग होणार नाही असे आश्वासन दिले होते. मात्र, त्याच महायुती सरकारमधील सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हा मार्ग करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत, यातूनच सरकारचा दुटप्पीपणा उघड होत आहे. आजचे सरकार शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करून केवळ कंत्राटदारांचे खिसे भरण्याचे काम करत आहे, असे त्यांनी यावेळी सांगीतले. निसर्ग आणि पर्यावरणाचा नाश करणारा, शेतकरी विरोधी, गरज नसलेला शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची सरकारला सद्बुद्धी मिळावी, म्हणून महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूरच्या विठुरायाला साकडे घालण्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांनी आषाढी वारीच्या दरम्यान सद्बुद्धी दिंडी काढली आहे. या निमित्ताने शक्तिपीठ विरोधी कृती समितीच्या पुढाकारातून पंढरपूर येथे आयोजित कार्यक्रमात वारकरी म्हणून आलेल्या शेतकऱ्यांसोबत संवाद साधला.

१३ जिल्ह्यांतील ग्रामीण अर्थव्यवस्था धोक्यात!

या प्रस्तावित महामार्गामुळे राज्यातील १३ जिल्ह्यांतील हजारो हेक्टर सुपीक शेती, शेतकऱ्यांची घरे, विहिरी, फळबागा आणि शेतीपूरक साधनसंपत्ती पूर्णपणे नष्ट होणार आहे. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या अस्तित्वावर घाला घालणारा कोणताही प्रकल्प खपवून घेतला जाणार नाही, असा आक्रमक निर्धार यावेळी सर्व नेत्यांनी व्यक्त केला.

दिग्गज नेत्यांची उपस्थिती:

या मेळाव्यात माजी मंत्री आमदार जयंत पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, आमदार सतेज (बंटी) पाटील, महादेव जानकर यांनीही सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांवर कडाडून प्रहार केला. या प्रसंगी आमदार अभिजित पाटील, आमदार कैलास पाटील, उमेश राजे निंबाळकर, विजय देशमुख, ॲड. समद पटेल यांच्यासह शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीचे पदाधिकारी आणि राज्यभरातून आलेले हजारो शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी संस्थानच्या वतीने कैलास नगर येथे वृक्षारोपण; २० महिलांचा सहभाग



**लातूर/प्रतिनिधी :** रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी संस्थान नानीज यांच्या वतीने लातूर तालुक्यातील हरंगुळ बु. च्या कैलास नगर येथील परिसरात २० महिला सद्भक्तांच्या सहभागातून वृक्षारोपण करण्यात आले. या संस्थानचा वतीने २०२६-२७ या वर्षात १.२५ कोटी वृक्षलागवडीचे ध्येय समोर ठेवून ५ ते १९ पर्यावरण संतुलित आणि समृध्द हरीत ग्राम संकल्पना मांडून हे वृक्षारोपण करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून लातूर येथील महिला सद्भक्तांनी आत्तापर्यंत जिल्ह्यात जवळपास १४००० वृक्ष लागवड केली असल्याची माहिती या महिला सद्भक्तांनी दिली.

या वृक्षारोपणात कैलास नगर हरंगुळ बु. येथील सद्भक्त श्री. काशिनाथ पांचाळ यांनी कैलास नगर लातूर जिल्हा जी डी मेजर यांनी वृक्षारोपणासाठी या परिसराची निवड केली. सौ. रंजनी कसबे, सौ. गोकर्णा कोळगिरे, सौ. राधा अवधूत, जयश्री मोटेगावकर, प्रमिला दरेकर, छाया तक, पुजा तरंगे, संगिता बिरादार, सुरेखा केंद्रे, छाया आचार्य, अश्विनी पाटील, यमुना कस्तुरे, वंदना मोरे आणि सुनिता थोरमोटे आदी महिलांचा सहभाग होता.

## सदनिकेतील बदलांसाठी लवकरच महापालिकेची परवानगी आवश्यक, उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश काय?

**मुंबई/प्रतिनिधी :** अनेक सदनिकाधारक घरात बेकायदेशीररित्या बदल करतात. घरातील जागा वाढवण्यासाठी काही जण खिडकीचं बांधकाम तोडून ती जागा आत घेतात. तसेच सदनिकेतील खिडक्यांना किंवा ओपन टेरेसला छत आणि ग्रिल बसवतात. या अशा कामांमुळे इमारतीच्या मुळ बांधकामाला धोका पोहचण्याची शक्यता नाकारता येता नाही. हा संभाव्य धोका टाळण्यासाठी आणि संबंधित महापालिकेला सदनिकाधारकाने घरात केलेल्या बदलांची माहिती मिळावी, यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाला महत्त्वाचे निर्देश दिले आहेत.

उच्च न्यायालयाने एका याचिकेवर सुनावणी करताना घरातील बांधकामात केलेल्या बदलांची माहिती आणि पालिकेकडून घेतलेल्या परवानगीची कागदपत्रं पोर्टलवर टाकणं अनिवार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यासाठी पोर्टल तयार करण्याबाबत उच्च न्यायालयाने सांगितलं आहेत. तसेच या पोर्टलचा गैरवापर होणार नाही, याची काळजी घेण्याचेही आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. सोबतच सदनिका आणि इमारतीच्या दुरुस्तीच्या कामांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याचे आदेशही दिले आहेत.

कळंबोलीतील 'नीलसिद्धी अमरंते' या सोसायटीतील एका रहिवाशानं यासंदर्भात हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या रहिवाशाने त्या आणि परिसरातील इतर काही सोसायट्यांमध्ये रहिवाशांकडून केल्या जाणाऱ्या बेकायदेशीर बदलांबाबत पनवेल महापालिकेकडे तक्रार केली. मात्र वारंवार तक्रार करूनही त्यांच्याकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे ही याचिका दाखल केल्याचं याचिकाकर्त्याने हायकोर्टाला सांगितलं. न्यायालयाने याची गंभीर दखल घेतली. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठानं राज्य सरकारला याबाबत एक सर्वसमावेशक धोरण ठरवण्याचे निर्देश दिले आहेत. काही लोकंच नियमांचं पालन करतात. तर बहुतांश जण वारंवार बेकायदेशीर बांधकाम करतच राहतात. सर्वत्र अनधिकृत गोष्टी होत आहेत. त्यामुळे आम्हीही अवैध कामं करु हे नागरिकांचं वर्तन खपवून घेतलं जाणार नाही. प्रत्येकानं कायद्याचं पालन करायलाच हवं. बेकायदा गोष्टी रोखण्यासाठी राज्य सरकारनं ठोस नियमावली तयार करायला हवी, असं निरीक्षण यावेळी हायकोर्टानं नोंदवलंय.


हायकोर्टाचे नेमके निर्देश काय? -: सध्या सर्वत्र घरांमध्ये किंवा इमारतीत मोठ्या प्रमाणात गैरबदल केले जात आहे. मात्र यासाठी एक सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्व असल्यास नागरिक नियमांनुसार दुरुस्तीची कामं योग्य प्रकारे करू शकतील. ही नियमावली लोकांना कायद्याचं पालन करण्यास प्रोत्साहन देईल. तसेच यामुळे कोणत्याही प्रकारचा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. प्रत्येक बांधकामावर लक्ष ठेवणं महापालिकेला शक्य होणार नाही. तेव्हा या नियमावलीमुळे महापालिकेचे कामही अधिक सोपं होईल, असं निरीक्षण यावेळी हायकोर्टानं नोंदवलं.

जानेवारी २०२७ पर्यत नियमावली तयार करण्याची मुदत : ही नियमावली तयार करुन त्याची प्रत राज्य सरकारनं राज्यातील सर्व महापालिकांना द्यावी. जेणेकरुन परवानगीसह कशा प्रकारे इमारतीची आणि दुरुस्ती करता येईल याची माहिती नागरिकांना मिळू शकेल. यासाठी या आदेशाची प्रत नगर विकास खात्याच्या अतिरिक्त सचिवांनाही देण्यात यावी. नियमावली कशाप्रकारे तयार करण्यात येईल याची माहिती राज्य सरकारनं १५ जानेवारी २०२७ रोजी हायकोर्टात द्यावी, असंही कोर्टानं आपल्या आदेशात नमूद केलंय.

# ज्येष्ठ समाजवादी विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन!

## गांधीवादी चळवळीतील एक पर्व काळाच्या पडद्याआड

**पुणे/प्रतिनिधी :** समाजवादी आणि गांधीवादी चळवळीतील एक महत्त्वाचा आवाज असलेले डॉ. कुमार सप्तर्षी यांचे शनिवारी पुण्यात निधन झाले.



ते ८४ वर्षांचे होते. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी सोमवारी सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत गांधी भवन येथे ठेवले जाईल. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि वैचारिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

डॉ. कुमार सप्तर्षी यांना मधुमेहाचा त्रास होता. शनिवारी त्यांना प्रकृतीअस्वास्थ्यामुळे एरंडवणे येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचे चिरंजीव डॉ. कबीर हे लंडनमध्ये असून शनिवारी संध्याकाळी ते पुण्यात पोहोचतील, असा अंदाज व्यक्त होत आहे.

**कोण होते कुमार सप्तर्षी?**

कुमार सप्तर्षी यांचा जन्म २१ ऑगस्ट १९३९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील खेड गावात झाला. त्यांचे वडील सरकारी डॉक्टर होते. पाचवीनंतरचे शिक्षण त्यांचे नगर शहरात झाले होते. बीएस्सीनंतर त्यांनी एमबीबीएसचे शिक्षण घेतले.

१९५६ ते १९६० या कालावधीत महाराष्ट्र आणि देशातील बदलत्या परिस्थितीतून सप्तर्षी यांच्या राजकीय विचारांची पायाभरणी झाली. महाविद्यालयात डॉक्टरकीचे शिक्षण घेत असताना वर्गप्रतिनिधींच्या निवडणुकांमध्येही ते सहभागी व्हायचे.

**निळू फुलेंमुळे 'समाजवादी'**

कुमार सप्तर्षी यांनी एका लेखात निळू फुलेंमुळे समाजवादाशी ओळख झाल्याचे सांगितले होते. कुमार सप्तर्षी हे महाविद्यालयात असताना लोकनाट्याच्या दिग्दर्शनासाठी निळू फुलेंना बोलावले होते. यादरम्यान निळू फुलेंनी कुमार सप्तर्षींना समाजवादावरची पुस्तके वाचायला दिली होती. तसेच निळू फुलेंमुळेच समाजवादी नेते डॉ. राम मनोहर लोहिया यांची भेट घडली आणि त्यानंतर कुमार सप्तर्षी यांनी आयुष्यभर समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार केला.

१९६७ मध्ये युवक क्रांती दलाची स्थापना

तरुणांना संघटित करून सामाजिक-राजकीय परिवर्तन करण्याच्या उद्देशाने १९६७ मध्ये कुमार सप्तर्षींनी सिंहगडावर युवक क्रांती दलाची स्थापना केली. डॉक्टर झाल्यानंतर कुमार सप्तर्षी यांनी पुण्यात दवाखाना सुरू केला. पाच वर्षे प्रॅक्टिस केल्यानंतर म्हणजेच १९६९ च्या सुमारास ते पूर्णवेळ युवक क्रांती दलाचे कार्यकर्ते म्हणून सक्रीय झाले.

**किमान ६२ वेळा अटक**

सामाजिक क्षेत्रातील अनेक आंदोलनांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. शैक्षणिक सुधारणा, युवकांचे सक्षमीकरण आणि लोकशाही हक्कांसाठी त्यांनी तीव्र आंदोलने केली. या आंदोलनांसाठी किमान ६२ वेळा त्यांना अटक झाली होती.

**जनता पक्षात प्रवेश**

१९७७ मध्ये कुमार सप्तर्षी आणि त्यांचे काही सहकारी जयप्रकाश नारायण यांच्या सांगण्यावरुन जनता पक्षात सामील झाले. १९७८ मध्ये अहमदनगर (सध्याचे अहिल्यानगर) मतदारसंघातून ते आमदार म्हणून निवडून आले होते.

**कुमार सप्तर्षींची ग्रंथसंपदा**

(१) आम्ही विद्यार्थी आणि आमच्या दंगली
(२) संकल्प
(३) यात्री
(४) स्वप्नांच्या सापळ्यांचा देश : अमेरिका
(५) येरवडा विद्यापीठातील दिवस
(६) सत्तातुराणाम
(७) चंद्रशेखर
(८) धर्माबद्दल
(९) सत्ताबदलाची दोन वर्षे
(१०) मोहनदास गांधी
(११) व्यक्तीरंग

## सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रातील निस्वार्थ नेतृत्व हरपले - मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे निस्वार्थ नेतृत्व हरपले, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ विचारवंत, गांधीवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, डॉ. सप्तर्षी समाजाला दिशा देणारे विचारवंत, गांधीवादी कार्यकर्ते आणि परिवर्तनवादी चळवळीचे प्रेरणास्थान होते. ग्रामीण परिवर्तन, सामाजिक न्याय, लोकशाही मूल्यांचे संवर्धन आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि तरुणांच्या मनात परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित करण्याचे मोठे कार्य केले. समाजातील अन्यायाविरुद्ध संघर्ष करताना त्यांनी नेहमीच सत्य, अहिंसा आणि लोकशाही मूल्यांचा आग्रह धरला. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने असंख्य कार्यकर्त्यांना सामाजिक बांधिलकीची प्रेरणा दिली.डॉ. सप्तर्षी यांच्या निधनाने ग्रामीण विकास, शिक्षण, सामाजिक न्याय आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीची मोठी हानी झाली आहे. त्यांनी उभा केलेला वैचारिक वारसा आणि संघर्षाचा मार्ग पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. आम्ही डॉ . सप्तर्षी परिवारासह, त्यांच्या कार्यकर्त्यांच्या दुःखात सहभागी आहोत, असे नमूद करुन मुख्यमंत्र्यांनी ज्येष्ठ विचारवंत, गांधीवादी नेते डॉ कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# केज येथील गोरख हजारे खूनप्रकरणी अजिंक्य उर्फ सन्नी लांडगेला जन्मठेप!

**केज/प्रतिनिधी** :केज शहरातील क्रांतीनगर भागात दोन वर्षांपूर्वी झालेल्या गोरख महावीर हजारे खून प्रकरणातील आरोपी अजिंक्य उर्फ सन्नी शामराव लांडगे याला केज येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने शुक्रवारी दि. १७ जुलै २०२६ रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आसून त्याला ३० हजार रुपये दंडही ठोठावण्यात आला असून दंड न भरल्यास एक वर्ष अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे.

दि. २३ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास केज येथील वसंत विद्यालयाजवळील क्रांतीनगर परिसरात गोरख महावीर हजारे वय १८ वर्षे आणि अजिंक्य उर्फ सन्नी लांडगे यांच्यात क्षुल्लक कारणावरून वाद झाला होता. यावेळी आरोपीने गोरख हजारे याला जीवे मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर काही वेळाने अजिंक्य उर्फ सन्नी लांडगे याने शर्टमध्ये लपवून ठेवलेल्या धारदार शस्त्राने गोरख हजारे यांच्या गळ्यावर वार केले होते.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या गोरख हजारे यांना नातेवाईकांनी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले आसता उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.




या प्रकरणी मयत गोरख हजारे यांचे नातेवाईक राज संजय गायकवाड यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा अजिंक्य उर्फ सन्नी शामराव लांडगे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता.

पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांनी या प्रकरणाचा तपास करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणाची सुनावणी केज येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात सत्र न्यायाधीश सुधीर भाजीपाले आणि आर. के. शेख यांच्रा न्यायालयात झाली.

आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासा सरकारी पक्षातर्फे पाच साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादीची साक्ष, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पुरावे तसेच सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या आधारे न्यायालयाने आरोपीस दोषी ठरविले. सहाय्यक सरकारी वकील अॅड. राम बिरंगळ यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने अजिंक्य उर्फ सन्नी शामराव लांडगे (रा. क्रांतीनगर, केज,) याला जन्मठेप आणि ३० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

### आरोपीला शेतातून घेतले होते ताब्यात

घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी अजिंक्य उर्फ सन्नी लांडगे याला बोबडेवाडी येथील शेतातून ताब्यात घेतले होते. या कारवाईत अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, आनंद शिंदे, वैभव सारंग तसेच पोलीस कर्मचारी श्रीकांत चौधरी, रुक्मिणी पाचपिंडे, बाळासाहेब अहंकारे, संतोष गित्ते, सचिन अहंकारे, शेख मतीन, प्रकाश मुंडे आणि चालक संभुदेव दराडे यांनी सहभाग घेतला होता.

या खटल्यात सहाय्यक सरकारी वकील अॅड. राम बी. बिरंगळ यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. त्यांना सहाय्यक सरकारी वकील अॅड. रविकुमार उदार आणि पैरवी पोलीस कर्मचारी रमा भालेराव यांनी सहकार्य केले.

## केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात एम.एस्सी.रसायनशास्त्र विषयासाठी पुर्व निरिक्षण व विस्तारीकरण समितीची भेट



**केज/प्रतिनिधी** : केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज येथे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी रसायनशास्त्र विषयात एम.एस्सी. करण्याची शैक्षणिक सुविधा निर्माण झाली आहे.

या साठी पुर्व पाहणी साठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर यांच्या अंतर्गत समितीने दि. १७ जुलै २०२६ रोजी भेट दिली आहे.या समितीचे अध्यक्ष डॉ.भगवानराव साखळे,रसायन तंत्रज्ञान विभाग , डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ तर सदस्य म्हणून डॉ.एस.एस.भुसारी, डॉ.विनय लोमटे हे होते. या प्रसंगी महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या भौतिक सुविधा,ग्रंथालय व रसायनशास्त्र प्रयोगशाळेची पाहणी केली.

या प्रसंगी छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर, प्राचार्य डॉ.अनिल किर्दंत, रसायन शास्त्र विषयाचे डॉ.अनिल गायकवाड, डॉ.सुरेश कांबळे डॉ.शितोळे, डॉ.सुवर्णकार, उपस्थित होते. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या साठी रसायनशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण (एम.एस्सी.) करण्यासाठी विद्यार्थी व विद्यार्थिनींना सुवर्ण संधी मिळणार आहे.

## परतीचा प्रवास अर्ध्यावरच ! नाशिकच्या कुटुंबाचा धुळ्यात भीषण अपघात ; दोघांचा मृत्यू , ५ गंभीर

**नाशिक/प्रतिनिधी** : नाशिकच्या एका कुटुंबाचा परतीचा प्रवास अपूर्णच राहिल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अजमेर येथे देवदर्शन आटोपून नाशिककडे परतीच्या प्रवासात असलेल्या भाविकांच्या कारचा धुळे जिल्ह्यात भीषण अपघात घडला आहे. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील शिरपूर फाट्याजवळ हा काळजाचा ठोका चुकवणारा अपघात घडला. या अपघातात कारमधील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, अन्य पाच जण गंभीररीत्या जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरु आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, नाशिक येथील एक कुटुंब इनोव्हा कारने अजमेरला देवदर्शनासाठी गेले होते. देवाचे दर्शन झाले , फिरणं झालं मात्र परतीच्या प्रवासात काळ आडवा आला. दर्शन घेऊन परतत असताना शिरपूर फाट्याजवळ भरधाव वेगात असलेल्या कारवरील चालकाचे अचानक नियंत्रण सुटले. अनियंत्रित झालेली ही कार वेगाच्या भरात थेट महामार्गावरील दुभाजक (डिव्हायडर) तोडून विरुद्ध दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर घुसली आणि समोरून येणाऱ्या एका मालवाहू ट्रकला अत्यंत वेगाने जाऊन धडकली. ही धडक इतकी भयंकर होती की, यामध्ये इनोव्हा कारचा चक्काचूर झाला आहे. स्थानिकांनी आणि पोलिसांनी जखमींना बाहेर काढत तात्काळ मदतकार्य राबवले.

दरम्यान, अपघातातील सर्व जखमी प्रवाशांना तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. देवदर्शनाहून आनंदाने घरी परतणाऱ्या नाशिकच्या या कुटुंबावर वाटेतच काळाने असा भयंकर घाला घातल्याने सर्वत्र तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रवादीत प्रफुल्ल पटेल नाराज नाहीत!- हसन मुश्रीफ

**मुंबई/प्रतिनिधी** : दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या आणि विलिनीकरण करून राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होणार असल्याच्या चर्चा राजकीय सुरू असतानाच, दुसरीकडे पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल हे पार्थ आणि सुनेत्रा पवार यांच्यावर नाराज असल्याचे बोलले जात आहे. मात्र, पक्षात कोणतीही नाराजी नसून सर्व नेते राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत, असा दावा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केला आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंदर्भात किंवा विलिनीकरणाबाबत कोणताही निर्णय घ्यायचा असल्यास, आता मुंबईत नाही तर दिल्लीतच चर्चा होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कोल्हापुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी पक्षांतर्गत घडामोडींसह महायुतीतील विविध मुद्द्यांवर सविस्तर भाष्य केले. मुश्रीफ म्हणाले की, येत्या २२ जुलैपासून पक्षाचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या स्मरणार्थ सेवा सप्ताह साजरा केला जाणार आहे. त्यानंतर २९ जुलै रोजी पार्थ पवार यांचा साखरपुडा असून, या कौटुंबिक सोहळ्यानंतरच राष्ट्रवादीच्या कोर कमिटीची बैठक बोलावली जाईल. पक्षातील सर्व आमदार आणि खासदारांना विश्वासात घेऊनच पुढील अंतिम निर्णय घेतला जाईल. तसेच, सोमवारपासून संसदेचे अधिवेशन सुरू होत असल्याने पक्षाचे तिन्ही प्रमुख नेते दिल्लीत असतील. त्यामुळे विलिनीकरणाबाबतच्या पुढील चर्चा तिथेच पार पडतील.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी घेतलेल्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंर्त्याच्या भेटीबाबत मुश्रीफ म्हणाले की, इस्लामपूरमधील लोकनियुक्त नगराध्यक्ष अपात्रतेच्या स्थानिक विषयासाठी ही भेट झाली होती.

## नागरिकांना आता मेट्रो पकडणे सोपे होणार!

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगर प्रदेशात मेट्रोचे जाळे पसरले आहे. अनेक प्रकल्प सुरू झाले आहेत. तर काही प्रकल्पांचे काम सुरू आहे. प्रवाशांनी जास्तीत जास्त मेट्रोचा वापर करावा, यासाठी अनेक विविध प्रकल्प मार्गी लावले जात आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) मेट्रोची थेट जोडणी रेल्वे स्थानकांना करण्यास आग्रही आहे. जेणेकरुन नागरिकांना मेट्रो पकडणे सोप्पे जाईल.



एमएमआरडीए मुंबई मेट्रो नेटवर्कमधील विविध मेट्रो स्थानके आणि त्यांना लागून असलेल्या व्यावसायिक तसेच निवासी संकुलांना फ ुट ओवर ब्रिज ने थेट जोडणी उपलब्ध करून देत लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करत आहे. या उपक्रमामुळे प्रवाशांची सोय वाढणार असून, मेट्रो प्रवासाला अधिक प्रोत्साहन मिळेल तसेच गजबजलेल्या रस्त्यांवरील पादचारी वर्दळही कमी होण्यास मदत होईल. एमएमआरडीएने अलीकडेच मेट्रो मार्गिका ४ वरील मेट्रो स्थानक आणि विक्रोळी येथील गोदरेजच्या व्यावसायिक संकुलादरम्यान थेट पादचारी पूल (फूट ओव्हर ब्रिज - इढ़ॅ) उभारण्यास मंजुरी दिली आहे. प्रस्तावित पादचारी पुलामुळे कर्मचारी, अभ्यागत आणि प्रवाशांना एलबीएस रोडचा वापर न करता थेट मेट्रो स्थानक आणि गोदरेज कॅम्पस दरम्यान पायी प्रवास करता येणार आहे. यामुळे पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेत लक्षणीय वाढ होईल, प्रवासाचा वेळ कमी होईल आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर अधिक वाढीस लागेल.

तसंच, मेट्रो मार्गिका ७ वरील ओबेरॉय मॉलला थेट मेट्रो जोडणी उपलब्ध करून दिल्यानंतर, खासगी विकास प्रकल्पाला मेट्रो स्थानकाशी थेट जोडणारा पादचारी पूल उभारण्यासाठी एमएमआरडीएकडून ना हरकत प्रमाणपत्र (ऱ्धण) मिळालेला हा दुसरा प्रस्ताव आहे. मेट्रो मार्गिका ७ वरील ओबेरॉय मॉलला उपलब्ध करून देण्यात आलेल्या थेट मेट्रो जोडणीमुळे या संकल्पनेचे यश आधीच दिसून आले आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना मुख्य रस्त्यावर न उतरता थेट व्यावसायिक संकुलात प्रवेश करता येतो, ज्यामुळे एकात्मिक लास्ट-माईल कनेक्टिव्हिटीचे फायदे अधोरेखित झाले आहेत.

एमएमआरडीएकडून आणखी अनेक प्रस्ताव विचाराधीन

एमएमआरडीए सध्या अशा स्वरूपाच्या आणखी अनेक प्रस्तावांचीही तपासणी करत आहे. त्यापैकी एक महत्त्वाचा प्रस्ताव म्हणजे मेट्रो मार्गिका २बीवरील भारत डायमंड बोर्सचा आहे. हा प्रस्ताव प्रत्यक्षात आल्यानंतर दररोज सुमारे ४०,००० प्रवाशांना त्याचा लाभ होण्याची अपेक्षा असून, परिसरातील रस्त्यांवरील पादचारी वर्दळ मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि मेट्रो हा प्रवासाचा अधिक पसंतीचा पर्याय म्हणून उदयास येईल.

## बोगस बियाणे, खते आणि कीटकनाशकांची तक्रार आल्यास अधिकारी येणार बांधावर

**मुंबई/प्रतिनिधी** : शेतकऱ्यांकडून बोगस बियाणे किंवा खतांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर पुढील सात दिवसांच्या आत कृषी अधिकारी प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन तपासणी करतील आणि आपला अहवाल अंतिम करतील, अशी घोषणा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शनिवारी केली. यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांची फेररचना करण्यात आली असून तसा शासननिर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे. खरीप हंगामात बियाण्यांच्या उगवण क्षमतेसह खते आणि कीटकनाशकांच्या गुणवत्तेबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत असतात. या तक्रारींचे तातडीने आणि प्रभावीपणे निराकरण व्हावे, यासाठी शासनाने तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची सुधारित रचना लागू केली आहे. तालुका कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या या समितीत कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र किंवा कृषी विज्ञान केंद्र आणि महाबीज यांचा प्रतिनिधी, तसेच संबंधित कृषी अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि वस्तुनिष्ठ तपासणी होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळण्यास मदत होईल, असे कृषी मंत्री म्हणाले. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित कंपनीचे प्रतिनिधी आणि विक्रेत्यांना तपासणीवेळी प्रत्यक्ष उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांकडील खरेदी पावत्यांची पडताळणी करून विहित नमुन्यात पंचनामा केला जाईल आणि संबंधित बियाण्यांच्या लॉटचे नमुने अधिसूचित प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. एखाद्या तालुक्यात तक्रारींची संख्या १०० पेक्षा अधिक झाल्यास तिथे अतिरिक्त तक्रार निवारण समित्या गठित करण्याचे अधिकार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

राज्यातील शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नाविन्यपूर्ण उपाययोजनांच्या विकासाला अधिक चालना मिळण्यासाठी राज्य शासनाने '?ग्री हॅकेथॉन'ला आता राज्यस्तरीय कायमस्वरूपी योजना म्हणून मान्यता दिली आहे. राज्यातील नऊही कृषी-हवामान विभागांना स्थानिक समस्यांवर त्यांच्या पातळीवर प्रभावी उपाययोजना विकसित करण्यास यामुळे मदत होईल. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट विजेत्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या घोषणेनुसार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने मुख्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. दरवर्षी विजेत्याला २५ लाख आणि उपविजेत्याला १५ लाख रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रात चक्राकार पद्धतीने या स्पर्धेचे आयोजन केले जाईल आणि निवड झालेल्या तंत्रज्ञानाची खरीप हंगामात प्रत्यक्ष शेतात चाचणी घेतली जाईल, असे भरणे यांनी स्पष्ट केले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त २२ जुलै २०२६ रोजी कृषी महाविद्यालय, पुणे येथे भव्य राज्यस्तरीय कृषी व पशुधन प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. पुढील ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात या प्रदर्शनाची सांगता होणार आहे.

या प्रदर्शनाच्या उद्घाटन व मुख्य कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

# जिल्हा बँकेत पक्षीय राजकारण कधीच केले नाही

### राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे प्रतिपादन

### शिरूर ताजबंद येथील जिल्हा बँकेच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन संपन्न

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची यशस्वी घौडदौड सुरू असून आम्ही जिल्हा बँकेत पक्षीय राजकारण कधीच केले नाही असे सांगून बँकेत चुकीचे काम केले नाही भविष्यात करणार नाही त्यामुळे लातूर जिल्हा बँकेची यशस्वी वाटचाल पुढेही सुरूच राहणार आहे असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी शिरूर ताजबंद येथे केले ते लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शिरूर ताजबंद शाखेच्या नूतन इमारतीचा भूमिपूजन सोहळा राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते शनिवारी संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते.






या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच साहेबराव जाधव होते व्यासपीठावर जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंदराव सुरवसे, समाज कल्याण विभाग सभापती उत्तमराव माने, उपनगराध्यक्ष अय्याजभाई शेख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, संचालक पृथ्वीराज शिरसाट अशोकराव गोविंदपुरकर, व्यंकटराव बिरादार मारोती पांडे, अनुप शेळके संचालिका सौ स्वयंप्रभा पाटील सौ अनिता केंद्रे, जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, बाजार समितीचे उपसभापती संजय पवार, तालुकाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, माजी उपनगराध्यक्ष मुजीब पटेल जहागीरदार, माजी सभापती चंद्रकांत मद्दे, माजी जिल्हा परिषद सदस्य महेश बिल्लापट्टे, उपाध्यक्ष निवृत्तीराव कांबळे, सरपंच मच्छिंद्र वाघमारे, बालासाहेब पाटील आंबेगावकर, प्रताप पाटील, प्रकाश ससाने, संग्राम स्वामी, अफरोज शेख, अशिष तोगरे, बाबुराव उडतेवार, तुळशीराम भोसले, सुभाषराव गुंडरे, माधवराव स्वामी, विकास महाजन, राजकुमार सोमवंशी, रामप्रसाद जाजू, बालाजी कातकडे, बालाजी पाटील, युसुफभाई सय्यद, नामदेवराव विराळे, संचालक मंडळ, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांचे चेअरमन व संचालक, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, बँकेचे अधिकारी-कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी बांधव खातेदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सहकार महर्षी दिलीपराव देशमुख व मी एकत्र येऊन जिल्हा बँक सुव्यवस्थित आणली - सहकार मंत्री**

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की माझ्या राजकारणाची सुरुवात ही गावातील सोसायटी पासून झाली,त्यानंतर आम्ही बँकेत संचालक म्हणून गेल्यानंतर बँकेची परिस्थिती अत्यंत वाईट होती मी आणि दिलीपराव देशमुख दोघांनी मिळून बँकेचे वसुली मेळावे घेऊन बँक सुस्थितीत आणली. लातूर जिल्ह्यात शेतकऱ्यांना, विद्यार्थ्यांना,उद्योजकांना वेगवेगळ्या माध्यमातून कर्ज देऊन त्यांना उभा टाकण्यासाठी मदत जिल्हा बँकेने केली आहे. आज अत्याधुनिक यंत्रणेद्वारे जिल्हा बँकेची यशस्वी वाटचाल सुरू असून कोविड काळात बँकेच्या कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. आम्ही बँकेत आत्तापर्यंत चुकीचे काम कधी केले नाही व भविष्यात सुद्धा कधीही चुकीचे काम करणार नाही. दहा गुंठे असलेल्या शेतकऱ्यांना सुद्धा आपण कर्ज देण्याची आता व्यवस्था करतोय. शेतकऱ्यांनी आता शेतीसोबत जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायाकडे वळले पाहिजे. दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक उन्नती साधली जाते असे ही सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव यांनी करत बँकेच्या वाटचालीविषयी सविस्तर आढावा सादर केला. यावेळी बँकेचे जेष्ठ संचालक अशोक गोविंदपूरकर यांनी मनोगत व्यक्त केले, यात त्यांनी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सहकार क्षेत्रासाठी अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतले असून आम्ही ज्या पश्चिम महाराष्ट्राकडे बघून सहकार शिकलो तेथील अनेक नेते सुद्धा आज सहकार मंत्री म्हणून बाबासाहेब पाटील यांचं कौतुक करत असताना आम्हाला आनंद होत असल्याची भावना अशोक गोविंदपूरकर आपल्या भाषणात व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव माने यांनी केले.

# बारावीनंतरच पदवीसोबत यूपीएससी-एमपीएससीची तयारी

## 'एमआयटी-एडीटी'चा अभिनव उपक्रम; प्रशासकीय अधिकारी होण्याचा मार्ग अधिक सुकर

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), बँकिंग, कर्मचारी निवड आयोग (एसएससी) तसेच अन्य स्पर्धा परीक्षांसाठी दरवर्षी लाखो विद्यार्थी प्रयत्न करतात. मात्र, पदवी पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्रपणे स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वेळ आणि आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो. ही गरज लक्षात घेऊन एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठाच्या एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसने (एसआयसीएस) बारावीनंतरच पदवी शिक्षणासोबत यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आणि इतर स्पर्धा परीक्षांची एकात्मिक तयारी करून देणारा बी.ए. (ॲडमिनिस्ट्रेशन) हा अभिनव अभ्यासक्रम सुरू केला आहे, अशी माहिती स्कूलचे प्राध्यापक डॉ. अरूण तुपे यांनी दिली. याप्रसंगी, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी प्रा.चंद्रकांत बोरुडे, लातूरच्या एमआयटी शैक्षणिक संकुलाचे जनसंपर्क अधिकारी श्रीधर घुले आदी उपस्थित होते.

डॉ. तुपे म्हणाले की, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेले विषय पदवी शिक्षणासोबतच शिकता यावेत, यासाठी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या अभ्यासक्रमाचा आराखडा यूपीएससी, एमपीएससी आणि बँकिंग स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत ठेवण्यात आला आहे. त्यामुळे पदवी पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांची भक्कम तयारी होण्यास मदत होते.

> यूपीएससी, एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांतून कौशल्याधिष्ठित, मूल्याधिष्ठित आणि सामाजिक जाण असलेले अधिकारी प्रशासनात यावेत, तसेच राष्ट्रउभारणीत त्यांचे मोलाचे योगदान असावे, हा आमचा उद्देश आहे. एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसच्या माध्यमातून अशाच सक्षम, संवेदनशील आणि कर्तृत्ववान भावी अधिकाऱ्यांची जडणघडण होणार आहे.
>
> **– प्रा. डॉ. मंगेश कराड**
> **कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती,**
> **एमआयटी-एडीटी विद्यापीठ,**
> **लोणी-काळभोर, पुणे**

या अभ्यासक्रमात भारतीय राज्यघटना, सार्वजनिक प्रशासन, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यव्यवस्था, आंतरराष्ट्रीय संबंध व भू-राजकारण, सुशासन, सार्वजनिक धोरण, सार्वजनिक वित्त, भारतीय व जागतिक अर्थव्यवस्था, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण, शाश्वत विकास, डिजिटल प्रशासन, कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा प्रशासनावरील प्रभाव, पर्यावरणीय धोरणे, चालू घडामोडी, विश्लेषणात्मक विचार, तार्किक क्षमता, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, व्यक्तिमत्त्व विकास, उत्तरलेखन आणि मुलाखत कौशल्य यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी एकाच शैक्षणिक चौकटीत करता येणार असून, स्वतंत्र वेळ आणि अतिरिक्त खर्चाची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. स्पर्धा परीक्षांसोबतच विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेवरही या अभ्यासक्रमात भर देण्यात आला आहे. शासन, सार्वजनिक क्षेत्र, बँकिंग, प्रशासन, धोरण विश्लेषण तसेच विविध स्पर्धात्मक करिअर क्षेत्रांसाठी आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी www.mitsics.edu.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा ९६०७५८००४२ / ९६०७५८००५२ या क्रमांकांवर संपर्क साधावा. तसेच, येत्या १८ व १९ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत डॉ.तुपे हॉटेल ब्रिज, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध असणार आहेत.




**तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन, नियमित टेस्ट सिरीज**

एमआयटी एसआयसीएसमध्ये विद्यार्थ्यांना तज्ज्ञ प्राध्यापकांचे (प्रोफेसर इन प्रॅक्टिस) मार्गदर्शन, नियमित टेस्ट सिरीज, उत्तरलेखनाचा सराव, मुलाखत प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. पदवी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षांची नियोजनबद्ध तयारी केल्यास वेळ, खर्च आणि प्रयत्नांची बचत होऊन यशाची शक्यता अधिक वाढते. याच उद्देशाने एमआयटी-एडीटी विद्यापीठाने शिक्षण आणि स्पर्धा परीक्षा तयारीचा प्रभावी संगम घडवून आणणारा हा अभ्यासक्रम विकसित केला असल्याचे प्रा.चंद्रकांत बोरुडे यांनी सांगितले.

## तुकाराम मुंढेंच्या एफडीआय चा धडाका, बेंगलोर अय्यंगार बेकरीवर धाड, गलिच्छपणा पाहून अधिकारीही चक्रावले

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथून अन्नपदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणून सोडणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. रेणापूर येथील प्रसिद्ध 'बेंगलोर अय्यंगार्स बेकरी'वर लातूरच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी थेट धाड टाकत एक मोठी आणि धडक कारवाई केली आहे. या धडक कारवाईमुळे रेणापूर परिसरातील आणि संपूर्ण जिल्ह्यातील अन्नपदार्थ विक्रेत्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

रेणापूरमधील महात्मा गांधी चौक भागात ही बेकरी कार्यरत होती. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या पथकाने जेव्हा या बेकरीत अचानक पाऊल ठेवले, तेव्हा तिथली भीषण परिस्थिती पाहून स्वत: अधिकारीही चक्रावून गेले. बेकरीच्या आत अत्यंत गलिच्छ आणि कमालीच्या अस्वच्छ वातावरणात ग्राहकांसाठीचे अन्नपदार्थ बनवले जात असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनाने आले.

या तपासणीदरम्यान अधिक धक्कादायक बाब म्हणजे, ग्राहकांच्या आरोग्याशी थेट खेळ मांडत चक्क मुदतबाह्य कच्चा माल वापरून बेकरीचे विविध पदार्थ तयार केले जात असल्याचे उघडकीस आले. या बेकरीमध्ये स्वच्छतेच्या नियमांना पूर्णपणे केराची टोपली दाखवण्यात आली होती, ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला होता. बेकरी चालकाचा हा निष्काळजीपणा आणि नियमांचे उल्लंघन पाहता, अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी जागीच कडक पावले उचलली. या बेकरीचा अन्न व्यवसाय परवाना तात्काळ आणि जागेवरच निलंबित करण्यात आला आहे. तसेच, या बेकरीचा संपूर्ण व्यवसाय तातडीने बंद पाडत प्रशासनाच्या वतीने दुकान सील करण्यात आले आहे.

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी घेतलेल्या या आक्रमक निर्णयामुळे रेणापूरमधील इतर व्यावसायिकांचेही धाबे दणाणले आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही अन्नपदार्थ विक्रेत्याची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा या कारवाईच्या माध्यमातून प्रशासनाने दिला आहे. आगामी काळातही जिल्ह्यातील अशा बेकायदा आणि अस्वच्छ हॉटेल्स तसेच बेकऱ्यांवर कारवाईचे सत्र सुरूच राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## पुणे हादरलं ! १७ वर्षीय मुलीने उचलले टोकाचे पाऊल थेट पाचव्या मजल्यावरुन....

**पुणे/प्रतिनिधी :**राज्यात आत्महत्येच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. अशातच पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे.इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून उडी मारून १७ वर्षीय मुलीने आपला जीव संपवला. या घटनेमुळे संपूर्ण धनकवडीतील निर्मल पार्क सोसायटीत खळबळ उडाली आहे. ही घटना गुरुवारी पहाटे ५:३० वाजता घडली.

धनकवडी, निर्मल पार्क सोसायटीत राहणारी रिद्धी रवी केडिया (वय १७) हिने हे टोकाचे पाऊल का उचलले? हे अद्याप माहित पडलेले नाही. सहकारनगर पोलिसांनी याप्रकरणी आत्महत्येचा गुन्हा दाखल केला आहे. रिद्धी शनिवारवाडा येथील एका महाविद्यालयाची विद्यार्थिनी होती. तिने नुकताच बारावी पास केली होती.

बुधवारच्या रात्री नेहमीप्रमाणे संपूर्ण केडिया परिवार जेवण झाल्यानंतर झोपला. रिद्धी तिच्या आजीजवळ झोपायची. पहाटे आजीला जाग आली, तेव्हा आजीला रिद्धी दिसली नाही. आजीने घरातील लोकांना याची माहिती दिली. यानंतर घरातील सर्व जणांनी तिचा शोध घेण्यास सुरुवात केली. मात्र रिद्धीचा घरात काहीही पत्ता लागला नाही. घराचा दरवाजा पाहिला असता तो आतून कडी कोयंडा लावून बंद होता. त्यामुळे घराच्या गॅलरीमध्ये जाऊन पाहीले असता त्यांना तेथे एक स्टूल ठेवलेले दिसले. कुटुंबियांनी तात्काळ इमारतीच्या खाली धाव घेतली. काही वेळानंतर रिद्धीचा शोध लागला. तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तिला उपचार करण्यापूर्वीच मृत घोषित केले.

.पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, आत्महत्याचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीसांनी तिचा मोबाइल, पुस्तके ताब्यात घेतली आहेत. पोलीस या प्रकरणाची सखोल तपासणी करत आहेत.

## मेस्सीला रोखण्याचा 'मास्टर प्लॅन' तयार! माजी फुटबॉलपटूने सांगितली खास युक्ती

**मुंबई/प्रतिनिधी :** फिफा विश्वचषक २०२६ चा अंतिम सामना न्यूयॉर्कमधील न्यू जर्सी येथे अर्जेंटिना आणि स्पेन यांच्यात खेळला जाईल. या सामन्याचे भारतात २० जुलै रोजी भारतीय वेळेनुसार मध्यरात्री १२:३० वाजता प्रसारण केले जाईल. या सामन्यापूर्वी, इंग्लंडचा माजी फुटबॉलपटू रॉबी फॉलने अंतिम सामन्यात मेस्सीला रोखण्यासाठी एक महत्त्वाची युक्ती सांगितली आहे. इंग्लंडचा माजी स्ट्रायकर रॉबी फाउलरच्या मते, अंतिम सामना जिंकण्याची स्पेनची शक्यता अधिक आहे. तथापि, लिओनेल मेस्सी हा एकमेव खेळाडू आहे जो एकहाती सामन्याचा निकाल बदलू शकतो. स्पेनची मिडफिल्ड विश्वचषकातील सर्वात चांगली आहे, परंतु मेस्सीसारख्या आक्रमकाला संपूर्ण ९० मिनिटे रोखणे हे फुटबॉलमधील सर्वात कठीण आव्हानांपैकी एक आहे.

झी५ शोमध्ये बोलताना रॉबी फाउलरने सांगितले की, लॅमिन यामाल अंतिम सामन्यात एक वेगळाच खेळाडू असेल आणि तो आणखी चांगली कामगिरी करेल. रॉबीच्या मते, स्पेनला थोडासा फायदा आहे कारण रॉड्री या स्पर्धेत चांगली कामगिरी करत आहे.

फाउलर म्हणाले की, या विश्वचषकात स्पेनने सर्वाधिक वेळ चेंडूवर ताबा ठेवला आहे. त्यांनी सुचवले की चेंडूवर ताबा ठेवण्याची ही शैली अर्जेंटिनासाठी धोकादायक ठरू शकते. ते म्हणाले, हे स्पष्ट आहे की स्पेनकडे चेंडूचा ताबा जास्त असेल. जर तुम्हाला मेस्सीने खेळावर नियंत्रण ठेवू नये असे वाटत असेल, तर त्याला चेंडू देऊ नका. हे बोलायला सोपे आहे, पण करायला कठीण आहे. पण स्पेन कसा खेळतो हे आपण पाहिले आहे.

मात्र, फाउलरने हे मान्य केले की, मेस्सीविरुद्ध सर्वात प्रभावी डावपेचही नेहमीच यशस्वी होऊ शकत नाहीत. तो म्हणाला, ''आपण सर्वजण एकत्र बसून मेस्सीला कसे थांबवायचे याचा विचार करतो. पण सत्य हे आहे की, तुम्ही त्याला पूर्णपणे थांबवू शकत नाही, कारण तो मेस्सी आहे आणि खात्रीने तो फुटबॉलच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ खेळाडू आहे.

## स्वा. रा. तीर्थ म. विद्यापीठात अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरू करावे

### सम्यक समाज संघाच्या वतीने कुलगुरू यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत, विविध महापुरुषांच्या नावाने ही अध्यासन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत .याचप्रमाणे या विद्यापीठात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने देखील एक अध्या अध्यासन केंद्र सुरू करण्यात यावे असे निवेदन डॉ. सुरेश वाघमारे, ॲड. मंचकराव डोणे व सोनेरावजी माने यांनी दिनांक १५ जुलै २०२६ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांना दिले.



वास्तविक पाहता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात काही वर्षांपूर्वी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने एक अध्यापन केंद्र सुरू करण्याबाबत विद्यापीठाने तीन सदस्यांची समिती गठित केली होती. त्यामध्ये अध्यक्ष प्राचार्य दिवंगत दळणार, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार व डॉ. सुरेश वाघमारे इ. होते या समितीने हे अभ्यासन केंद्र सुरू करण्यासंबंधी शिफारस विद्यापीठाला केली होती, परंतु पुढे ह्याचे काय झाले कळाले नाही? ही बाब हे निवेदन देताना कुलगुरूच्या लक्षात आणून दिली. यावर त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन दर्शविला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत, अध्यासन केंद्र सुरू केल्यास राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक कार्याची लोकप्रिय कामाची माहिती या अध्यासनाद्वारे आयोजित केलेल्या प्रचारातून विविध उपक्रमातून होऊ शकेल.

या दृष्टिकोनातून ही सुरुवात होणे गरजेचे आहे त्याचप्रमाणे अशा प्रकारचे अ अध्यासन केंद्र सुरू व्हावे अशी मागणी अनेक वर्षापासून विद्यार्थी शिक्षक यांच्याकडून होत आहे.

## 'एनडीए'त जाणार नाही - जयंत पाटील

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण होणार असल्याच्या आणि शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे महायुती सरकारमध्ये नवे अर्थमंत्री म्हणून शपथ घेणार असल्याच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात चांगलाच जोर धरला होता. मात्र, या सर्व चर्चांना खुद्द जयंत पाटील यांनी पंढरपूर येथे पूर्णविराम दिला आहे. आम्ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीत जाणार नाही आणि विलीनीकरणाबाबत आमची कोणाशीही कोणतीही चर्चा सुरू नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी या बातम्या निव्वळ अफवा असल्याचे सांगितले. आम्ही सर्व जण शरद पवार यांच्यासोबत पूर्ण निष्ठेने उभे असून कार्यकर्त्यांनी मनात कोणताही संभ्रम बाळगू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.



जयंत पाटील आणि भाजपचे नेते विनोद तावडे यांची भेट, त्यापाठोपाठ ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील भेट आणि नुकतीच जयंत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांची घेतलेली भेट, या वेगवान घडामोडींमुळे राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले होते. जयंत पाटील यांच्या गळ्यात अर्थमंत्री पदाची माळ पडणार अशा बातम्याही माध्यमांमधून समोर येत होत्या. या पार्श्वभूमीवर शनिवारी पंढरपूर येथे शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या अधिवेशनासाठी आले असता जयंत पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला आणि रंगलेल्या चर्चा फेटाळून लावल्या.

आम्हाला एनडीएकडून कोणतेही निमंत्रण आलेले नाही आणि तिथे जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे सांगत पाटील यांनी माध्यमांना टोला लगावला की, आम्ही कुठलीही स्पर्धा करत नाही, कुठले खाते मागितलेले नाही आणि कोणतीही मागणी केलेली नाही, तरीसुद्धा गेल्या दोन-तीन दिवसांत माध्यमांनी मला दोन-तीनदा अर्थमंत्री पदाची शपथ दिल्यासारखेच दिसत आहे. या वेगवेगळ्या बातम्या पाहून आमची करमणूक होत असून त्यावर वारंवार काय प्रतिक्रिया देणार, असेही ते म्हणाले.

पक्षाच्या विलीनीकरणाबाबत किंवा एनडीएसोबत जाण्याबाबत या क्षणापर्यंत कोणतीही चर्चा झालेली नाही. आम्ही सध्या सरकारच्या धोरणांच्या विरोधातच काम करत असून शक्तिपीठ विरोधी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठीच इथे आलो आहोत. त्यामुळे महायुतीसोबत जाण्याच्या चर्चांमध्ये काडीचेही तथ्य नाही. पक्षाचे सर्व आमदार आणि खासदार शरद पवार साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत, असेही जयंत पाटील यांनी सांगितले.

## गोकुळ कर्मचारी संघटनेचा सोनम वांगचुक यांना पाठिंबा; आंदोलन का केलं? जय श्रीरामच्या घोषणा देत भाजप कार्यकर्त्यांचा गोकुळ कार्यालयात गोंधळ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी कॉकरोच जनता पार्टीने दिल्लीत मोठं आंदोलन उभं केलं आहे. दरम्यान, आंदोलनानंतर सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक जंतरमंतरला गेल्या २० दिवसांपासून उपोषण करत आहेत. अशातच त्यांची प्रकृती खालावत असल्याने देशभरातून चिंता व्यक्त केली जात होती. दरम्यान दिल्लीतील या आंदोलनात शनिवारी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास मोठा गोंधळ पाहायला मिळाला. ऱ्एऊ परीक्षेतील कथित फेरफार आणि अनियमिततेच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर-मंतर इथे उपोषणाला बसलेल्या पर्यावरणशास्त्रज्ञ सोनम वांगचुक यांना आंदोलन स्थळावरुन हटवण्यात आलं. तिथून सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल केलं गेलं. त्यानंतर उपस्थित आंदोलक आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. अशातच आता सोनम वांगचुक यांच्या दिल्लीतील आंदोलनाची धग थेट कोल्हापुरातील गोकुळ दूध कार्यालयापर्यंत पोहोचल्याचे चित्र आहे.

गोकुळ दूध संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. यानंतर गोकुळ मधील पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या आंदोलनावर भारतीय जनता पार्टीने आक्षेप घेतला होता. अशातच काल सोनम वांगचुक यांना पाठिंबा देण्यासाठी केलेल्या आंदोलनाबद्दल भाजप पदाधिकाऱ्यांनी जाब समर्थन करणाऱ्यांना जाब विचारला आहे.

## सुदानच्या उच्चस्तरीय कृषी शिष्टमंडळाची पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठाला भेट

### बांबु शेती व बांबु उद्योग, कापूस संशोधन, बियाणे तंत्रज्ञान, ग्रीन हायड्रोजन व कौशल्य शिक्षणात सहकार्याची तयारी

**लातूर/प्रतिनिधी :** सुदानमधील कसला प्रांताचे कृषिमंत्री डॉ. खिदिर रमादान सादिग मोहंमद यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय कृषी व व्यापार शिष्टमंडळाने लोदगा (ता. जि. लातूर) येथील पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठाला भेट देऊन कृषी शिक्षण, कौशल्य विकास आणि भारत-सुदान कृषी सहकार्याच्या विविध संधींवर चर्चा केली.

बैठकीत बांबु शेती व बांबु उद्योग,कापूस संशोधन, बियाणे तंत्रज्ञान, ड्रोन-आधारित शेती, प्रिसिजन ॲग्रिकल्चर, ग्रीन हायड्रोजन, हरित ऊर्जा, बांबू अर्थव्यवस्था, सौर उर्जा पवन ऊर्जा आणि कृषी निर्यात या क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार करण्याबाबत चर्चा झाली. तसेच, सुमारे १०० सुदानी विद्यार्थ्यांना विद्यापीठात कृषी कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण देण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला. यावेळी कृषिमंत्री डॉ. खिदिर रमादान सादिग मोहंमद यांनी अफ्रीकी-एशियाई ग्रामीण विकास संगठन (AARDO) चे महासंचालक यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून या उपक्रमांसाठी AARDO च्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. कृषी शिक्षण, क्षमता विकास, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये AARDO अंतर्गत येणार्या आशिया आणि आफ्रिकेतील सुमारे ३२ देशांतील विद्यार्थ्यांना लोदगा येथे शिक्षण, संशोधन आणि कौशल्य प्रशिक्षणासाठी सक्रिय सहकार्य करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

गेल्या काही वर्षांतील अस्थिरतेनंतर सुदान आपल्या कृषी अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नात असून, विशेषतः जगप्रसिद्ध कापूस उत्पादन पुन्हा उभे करण्यासाठी भारतासोबतचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. सुदान आणि महाराष्ट्रातील हवामान तसेच जमिनीच्या प्रकारातील साम्यामुळे हे सहकार्य अधिक प्रभावी आणि परिणामकारक ठरेल, असा विश्र्वास दोन्ही बाजूंनी व्यक्त करण्यात आली.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्र्यांच्या पर्यावरण व शाश्वत विकास कृती दलाचे कार्याध्यक्ष पाशा पटेल यांनी भारत-आफ्रिका कृषी सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे सांगितले. बैठकीस फिनिक्स फाउंडेशनचे समन्वयक डॉ. परवेज पाशा पटेल, राज्याचे MITRA संस्थेच्या बांबू विभागाचे प्रमुख तथा माजी महासंचालक श्री. नंदकुमार आणी विद्यापीठाचे पदाधिकारी तसेच दोन्ही देशांतील प्रतिनिधी उपस्थित होते.




हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.